# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


---

क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 280 /2020 दिनांक: 07 /05/2020

---

वाचा :-

1. आपत्ती व्यवस्थापन कायदा – 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 216 /2020 दिनांक 14.04.2020
6. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 242 /2020 दिनांक 14.04.2020
7. फौजदारी प्रक्रिया संहिता – 1973
8. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे आदेश No.DMU/2020/CR.92/ DisM-1 दिनांक 30 एप्रिल 2020
9. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 270 /2020 दिनांक 03.05.2020
10. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभा यांचे परिपत्रक क्र. संकिर्ण-2020/ प्र.क्र.268/ एसडी-2, दि. 04.05.2020

**कोविड-19 विषाणुचा प्रादुर्भाव लॉकडाऊन / संचारबंदी कालावधीत फेब्रुवारी-मार्च 2020 च्या इयत्ता 10 व 12 वी च्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणीच्या कामांसाठी नियुक्त अधिकारी/शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचारी व अन्य कर्मचारी यांना संचारबंदी शिथील करण्याबाबत.**

## *आदेश*

**ज्या अर्थी,** शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड – 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणूमूळे (COVID-१९) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि,**

**ज्याअर्थी,** अकोला जिल्हयामध्ये **दिनांक** 17.05.2020 चे मध्यरात्रीपर्यंत जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवा वगळता **सिमाबंदी व संचारबंदी** लावण्यात आली आहे. **आणि,**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे आदेश No.DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 30 एप्रिल 2020 चे आदेशाद्वारे संचारबंदी बाबत अतिरिक्त मार्गदर्शक तत्वे जाहीर करण्यात आली आहेत. अकोला जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व फैलाव रोखण्याचे दृष्टीने विविध आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 मधील तरतुदीनुसार संचारबंदी बाबतचे आदेश पारीत करण्यात आले आहेत. **आणि,**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाने माहे फेब्रुवारी-मार्च 2020 च्या इयत्ता 10 व 12 वी च्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणीच्या कामांसाठी नियुक्त अधिकारी शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचारी व अन्य कर्मचारी यांना प्रवासाकरीता सुट देणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी,** मी **जितेंद्र पापळकर,**भाप्रसे **जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2, 3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च

NitinN387

2020 चे अधिसूचनेनूसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये, पुढील प्रमाणे नमूद बाबींकरीता अटी व शर्तीचे अधीन राहून प्रवासाकरीता संचारबंदी व सीमाबंदीतून सुट देणेबाबताचेआदेश पारीत करीत आहे.

1. उत्तरपत्रिका परीक्षाकेंद्रावरुन किंवा पोष्टातून माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयाकडे पाठविणे
2. शिक्षकअथवा शिपायामार्फत उत्तरपत्रिका शाळेतून परीक्षकांच्या घरी घेऊन जाणे.
3. परिक्षकांकडून नियामक (Moderators) कडे उत्तरपत्रिका पोहचविणे.
4. नियामकांकडील उत्त्तरपत्रिका विभागीय मंडळाकडे जमा करणे.
5. परीक्षेतील गैरमार्ग प्रकरणी चौकशी करण्यासाठी परीक्षा मंडळाच्या नियुक्त अधिका-यांनी प्रवास करणे.

**अटी व शर्ती**

1. संबंधीत कामाकरीता मंडळाने दिलेले लेखी आदेश व स्वताचे ओळखपत्रजवळ बाळगणे बंधनकारक राहील.
2. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांचे अधिनस्त विभागीय मंडळातील अधिकारी,कर्मचारी व शिक्षक यांना प्रवास करता येईल.
3. हि सुट खाजगी/ सार्वजनिक वाहनासअथवा मंडळाच्या ठेकेदाराकडील भाडेतत्वावर घेतलेल्या वाहनांना राहील.

सदर आदेश आज **दिनांक** 07 **मे** 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

जिल्हादंडाधिकारी
अकोला

**( जितेंद्र पापळकर,भाप्रसे )**
**जिल्हादंडाधिकारी, अकोला**

**प्रतिलिपी-**

१. मा. विभागीय आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
२. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, अमरावती.
३. जिल्हा पोलीस अधिक्षक,अकोला यांना तथा उचित कार्यवाहीस्तव.
४. आयुक्त, महानगर पालिका अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
५. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
६. उपविभागीय अधिकारी --------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
७. तहसिलदार अकोला-------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
८. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

**जिल्हादंडाधिकारी, अकोला**